# सातारा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. सातारा

## -∂परिपत्रक☆-

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेच्या दि. २७/०३/२०२१ रोजीच्या वार्षिक सभेतील ठराव क्र. ०९ नुसार व मा. संचालक मंडळ मासिक सभा दि. ०५/०७/२०२१ मधील ठराव क्र. ०७ नुसार **माहे ऑगस्ट २०२१** पासून **मध्यम मुदत कर्जाची मर्यादा रू. ६,००,०००/-(रू. सहा लाख फक्त)** करणेत आली आहे.

**रू.६,००,०००/-मध्यम मुदत कर्जाची परतफेड जास्तीत जास्त १०० हफ्त्यात करणेत येईल.**

संस्थेची अंतर्गत तपासणी करत असताना असे लक्षात आले आहे की, अनेक सभासद २ पेक्षा जास्त कर्जदारांना जामीन राहत आहेत. ही बाब संस्था पोटनियमाच्या विरूध्द आहे. तरी, सर्व सभासदांना विनंती करणेत येते की, जामीनदार म्हणून सही करताना आपण यापूर्वी किती सभासदांना जामीन आहोत याची खात्री करावी. तसेच कर्ज अर्ज देणारे सभासदांना विनंती करणेत येते की, आपले जामीनदार सभासद हे यापूर्वी २ पेक्षा जास्त कर्जदारांना जामीनदार आहेत किंवा नाही. याबाबत खात्री करावी.

मध्यम मुदत कर्ज मंजूर करताना सभासदत्वास १ वर्ष पूर्ण असणाऱ्यास ५००००/-, २ वर्ष पूर्ण असल्यास १,५०,०००/- व ३ वर्ष व तद्नंतर प्रथम कर्ज घेणाऱ्या सभासदास संपूर्ण कर्ज रक्कम म्हणजेच रू. ६,००,०००/- मंजूर करणेत येईल परंतू तीन वर्षानंतर प्रथम वेळी कर्ज सुविधा घेणाऱ्या सभासदाची शेअर्स रू. ८५,०००/- नसतील तर शेअर्स कपात १५% ने करणेत येईल.

तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

आपले विश्वासू

(श्री. मकरंद सुधाकर गद्रे)